# महाराष्ट्र शासन

| | |
|---|---|
| तात्काळ<br>mail –sd२.scsd-mh@gov.in | क्रमांक:- प्रवेश-२०१८/प्र.क्र.३३३/एसडी-२<br>शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,<br>मादाम कामा मार्ग, हुतात्मा<br>राजगुरु चौक, मंत्रालय, विस्तार, इमारत, मुंबई-३२<br>दिनांक :-२९ जुलै, २०२० |

**प्रति,**

**शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक),**
**महाराष्ट्र राज्य,**
**मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग,**
**पुणे-४११००१**

**विषय :-** इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२०-२१ वेळी आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ:-** १. शासन निर्णय क्र.प्रवेश-२०१८/प्र.क्र.३३३/एसडी-२ , दि.२३/०६/२०२०
२.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, यांचे क्र.विद्या-ए-१/ ११.प्रवेश/२०२०, दि.२५/०७/२०२० चे पत्र

आपल्या दि.२५ जुलै, २०२० रोजीच्या संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने, कोविड-१९ आजारामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सन २०२०-२१ मधील इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी सादर करावयाच्या विविध प्रमाणपत्रांबाबत आपणास खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१. इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरतेवेळी फक्त इ. १० वीचे ऑनलाईन गुणपत्रक अपलोड करणे बंधनकारक करण्यात यावे.

२. अ) ज्या विद्यार्थ्यांकडे माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला, रहिवासी (Domicile) प्रमाणपत्र, जातीचा दाखला, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (NCL) ही प्रमाणपत्रे उपलब्ध असतील, असे विद्यार्थी सदर प्रमाणपत्रे अपलोड/ सादर करु शकतील. तथापि, सदर प्रमाणपत्रे अपलोड/ सादर करणे बंधनकारक करण्यात येऊ नये.

ब) क्रीडा प्राविण्य प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र, माजी सैनिक प्रमाणपत्र, अनाथ प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, बदली आदेश, इ. समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे किंवा सदर प्रमाणपत्रे मिळण्यासाठी सादर केलेल्या अर्जांची प्रत विद्यार्थ्यांनी अर्ज भरतेवेळी अपलोड करणे आवश्यक राहील.

Scanned with CamScanner

३. इ. ११ वी प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांनी काही तांत्रिक बाबींमुळे सादर न केल्यास त्यांच्याकडून हमीपत्र भरुन घेण्यात यावे. विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात यावी.

४. इ. ११ वी मध्ये विद्यार्थ्यांना देण्यात येणारा प्रवेश हा विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे व हमीपत्राच्या आधारे देण्यात असल्याचे आणि अचूक व योग्य कागदपत्रे सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांची असल्याचे संकेतस्थळावरुन विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

यानुषंगाने आपल्या स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही करावी.

(राजेंद्र पवार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner